पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- १९/१२/२०१९

## मौजा हेटीनगर येथे भव्य आरोग्य मेळावा संपन्न

=> नागरिकांना दिली विविध शासकीय योजनांची माहिती

मा. पोलीस अधिक्षक, गडचिरोली श्री. शैलेश बलकवडे सा़े., मा. अपर पोलीस अधिक्षक, श्री. डॉ. मोहित कुमार गर्ग सा़े., मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. अजयकुमार बंसल सा़े., व श्री. विक्रांत गायकवाड सा़े. उप विभागीय पोलीस अधिकारी धानोरा अती. कार्यभार कुरखेडा, व उप विभागीय पोलीस अधिकारी श्री. जयदत्त भवर सा़े यांचे मार्गदर्शनात मौजा हेटीनगर येथे **भव्य आरोग्य मेळावा** व **राणी दुर्गावती महिला हस्तकला स्पर्धा** घेण्यात आली.

सदर मेळाव्यात मा. नायब तहसीलदार मडावी सा., कृषी अधिकारी कुरखेडा, उपजिल्हा रुग्णालय कुरखेडा येथील आरोग्य अधिकारी डॉ. कांबळी सा., पशुसंवर्धन विकास अधिकारी डॉ. आमले सा., तसेच एमएसईबी व वन विभाग यांचे प्रतिनिधी या सर्वांनी उपस्थित ग्रामस्थांना शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. तसेच उपजिल्हा रुग्णालय कुरखेडा व पोलीस रुग्णालय, गडचिरोली येथील टीमने उपस्थित नागरीकांची आरोग्य तपासणी केली.

त्याच प्रमाणे **गावातील विधवा महिलांना साडी तर अपंग पुरुषांना टोपी घलुन शर्ट व पॅन्ट** पीस देण्यात आले. महिलांसाठी रांगोळी तसेच सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. यातील विजेत्यांना योग्य पारितोषिक देण्यात आली. तसेच हस्तकला स्पर्धकांना रुपये ३,०००/-, २,०००/-, १,०००/- असे बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमा दरम्याण गडचिरोली येथील कलापथक यांनी उपस्थितांना प्रबोधन केले. सदर मेळाव्यत गावातील पोलीस पाटील व १,००० ते १२०० लोक सहभागी झाले होते.

ग्रामस्थांनी गडचिरोली पोलीस दलाने घेतलेल्या मेळाव्या बद्दल आभार मानत मेळाव्यामुळे आपल्याला विविध शासकीय योजनांची माहिती मिळुन त्याच्या लाभ कशाप्रकारे घेता येईल हे समजल्याचे म्हंटले.




उपजिल्हा रुग्णालय, कुरखेडा
मोफत
तपासणी शिबीर
दिनांक -
दिशा
उपजिल्हा रुग्णालय, कुरखेडा


पोलीस स्टेशन, पुराडा
गडचिरोली पोलीस
पोलीस स्टेशन, पुराडा



पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- १९/१२/२०१९

## अतिसंवेदनशील मौजा भंगारामपेठा येथे भव्य जनजागरण मेळावा संपन्न

उप पोलीस स्टेशन दामरंचा अतर्गत अतिसंवेदशील मौजा भंगारामपेठा येथे आदरणीय पोलीस अधिक्षक, मा. श्री. शैलेश बलकवडे सा़ो., अति. पोलीस अधिक्षक, मा. श्री. डॉ. मोहित कुमार गर्ग सा़ो., अति. पोलीस अधिक्षक, मा. श्री. मनिषकुमार कलवानिया सा़ो., व उप विभागीय पोलीस अधिकारी जिमलगट्टा मा. श्री. राहुल गायकवाड सा़ो. यांचे मार्गदर्शनाखाली भव्य जणजागरण मेळावा पार पाडला.

या मेळाव्यास उप पोस्टे हद्दीतील जवळपास ८०० ते १,००० नागरिक व शालेय विद्यार्थी उपस्थित होते. मेळाव्यामध्ये नागरिकांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, रोजगार, व्यसनमुक्ती, शैक्षणिक महत्व, नक्षल मुक्त गडचिरोली, स्वच्छता, आरोग्य, लघुद्योग, पोलीस भरती ई. विषयावर प्रभारी अधिकारी पोउपनि आपासाहेब पडळकर व उपस्थित मान्यवरांनी मोलाचे मार्गदर्शन केले. मेळाव्यामध्ये राणी दुर्गावती हस्तकला स्पर्धेचे आयोजन करुन महिलांमधील कलागुणांना वाव देवुन विजेत्या मुलींना प्रथम, व्दितीय, तृतीय बक्षीस वाटप करण्यात आले.

त्याचबरोबर गरजुंना मेळाव्यामध्ये साड्या, धोतर, क्रिडा साहित्य, ब्लॅकेट, शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले. मेळाव्याची सांगता स्नेह भोजनाने करण्यात आली.





पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- १९/१२/२०१९

## मौजा चिंतलगुडम येथे भव्य जनजागरण मेळावा संपन्न

=> ग्रामस्थांनी मानले गडचिरोली पोलीस दलाचे आभार

आदरणीय पोलीस अधिक्षक, मा. श्री. शैलेश बलकवडे साो., अति. पोलीस अधिक्षक, मा. श्री. डॉ. मोहितकुमार गर्ग साो., अति. पोलीस अधिक्षक, मा. श्री. मनिषकुमार कलवानिया साो., व उप विभागीय पोलीस अधिकारी जिमलगट्टा मा. श्री. राहुल गायकवाड साो. यांचे मार्गदर्शनाखाली उप पोलीस स्टेशन रेपनपल्ली अतर्गत मौज चिंतलगुडम येथे भव्य जणजागरण मेळावा नुकताच संपन्न झाला.

या मेळाव्यास उप पोस्टे हद्दीती जवळपास ९०० ते १,००० नागरिक व शालेय विद्यार्थी उपस्थित होते. मेळाव्यामध्ये नागरिकांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, रोजगार, व्यसनमुक्ती, शैक्षणिक महत्व, नक्षल मुक्त गडचिरोली, स्वच्छता, आरोग्य, लघुद्योग, पोलीस भरती, विकासकामे ई. विषयावर उपस्थित मान्यवरांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

मेळाव्यामध्ये राणी दुर्गावती हस्तकाला स्पर्धेचे आयोजन करुन महिलांमधील कलागुणांना वाव देवुन विजेत्या मुलींना प्रथम (३,०००/- रु.), व्दितीय (२,०००/- रु.), तृतीय (१,०००/- रु.) बक्षीस वाटप करण्यात आले.

मेळाव्यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र कमलापुर येथील स्टॉप उपस्थितील होते. त्यांनी उपस्थित नागरिकांना मोफत औषधउपचार मुलींना सॅनिटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले.

मेळाव्यामध्ये उपस्थित नागरिकांना स्वेटर, साड्या, धोतर, क्रिडा साहित्य, ब्लॅकेट, शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले. मेळाव्याची सांगता स्नेह भोजनाने करण्यात आली.


भव्य जनजागरण मेळावा

